नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २२/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत १५ कि.मी अंतरावरील चिचोली बाबुलखेडा येथे दिनांक २१/०२/२०२२ चे ०९:०० वा. ते १०.०० वा. फिर्यादी नामे- रूपेश रमेशराव खवशे वय ३२ वर्ष, रा. आर्य नगर नागपुर वीज वीतरण कंपनी मर्या हे वीज महावीतरण कंपनीमध्ये सहायक अभीयंता असुन मौजा चिचोली येथील श्री भिमराव शेंडे व बापुराव शेंडे व बापुराव पाटील यांच्या शेतामधुन लघुदाब वीजवाहीनीचे अज्ञात आरोपीने चार सिमेंट पोल किमती ५,२००/-रू. चे तोडुन नुकसान करून त्यावरील १६८० मीटर ॲल्युमीनीयम तार किमती ४२,५००/- रू. चे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश ठाकरे मो.नं. ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :- अंतर्गत ११ कि.मी अंतरावरील साळवा येथे दिनांक २२/०२/२०२२ चे पहाटे ०३.०० वा. फिर्यादी नामे- हनुमंता रामरावजी वैध, वय ७० वर्ष, रा. साळवा हे बकरी पालनाचा व्यवसाय करीत असुन त्यांचे घराचे बाजुला असलेल्या बकऱ्याच्या गोटयातील २२ बकऱ्या किंमत २,६०,०००/- रू. चा माल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर